
असा हा अँथनी!

टोमी द पाओला


अनुवाद: सुजाता गोडबोले



असा हा अँथनी!

टोमी द पाओला

अनुवाद: सुजाता गोडबोले




मदर फिलीस, 'सुटातील साहेब' डग

आणि

माझी कलाकार, खवय्यी मैत्रीण सिसिलिया

यांच्यासाठी



आता आपण ज्याला इटली म्हणून ओळखतो त्या देशातील उत्तरेकडच्या डोंगराळ प्रदेशातील एका मळ्यात आज छान सूर्यप्रकाश होता.

एका मोठ्या मेजवानीची सगळी तयारी झाली होती.

सगळे कुटुंब मळ्यातल्या घराच्या दाराशी जमले होते.

"हे पहा, बाळ आलं," रोझेटा मावशी सगळ्यांना म्हणाली.

आजी-आजोबा एका तान्हया मुलाला घेऊन बाहेर आले आणि त्यांच्यामागे होते त्या बाळाचे आई-वडील, त्यांचा चेहरा आनंदाने फुलला होता.

"आता चर्चकडे जाऊ या," आजोबा म्हणाले.

"हा सर्वात आनंदाचा दिवस आहे. हा पहिलाच मुलगा आहे आणि मोठेपणी तो खूप काही करेल."

"नाही तरी, मुले म्हणजेच आपले भवितव्य आहे." एमिलियो आजोबा म्हणाले.



आता नामकरण समारंभासाठी सर्वजण चर्चमध्ये आले. सगळेजण भोवताली जमल्यावर आजी-आजोबांनी बाळाला हातात घेतले. बाळाला छान गाढ झोप लागली होती. आई त्याच्या कानात हळूच म्हणाली, “बाळा, उठ, मार्चेलो गुरुजी काय म्हणतात ते ऐक तरी.”



“आजपासून तुझं नाव अँथनी असेल,”
असे म्हणत धर्मगुरू पवित्र जल शिंपडू लागले.



तेवढ्यात गाढ झोपलेल्या अँथनीने झोपेतच आपले हात उडवले आणि गुरुजींच्या हातातील मंतरलेले पाणी बाळावर आणि आजूबाजूच्या लोकांवर सांडले.



“अगं बाई, अँथनी बाळावर पाणी सांडलं तरी तो उठला नाही आणि रडलाही नाही. किती शहाणा आहे ना!” रोझेटा मावशी ग्रासिएला आजीच्या कानात म्हणाली.

“हां! कोणास ठाऊक...” ग्रासिएला आजी म्हणाली, जमलेले लोक अंगावरचे पाणी झटकत होते तिकडेच तिचे सगळे लक्ष होते ...







अँथनी बाळाच्या पहिल्या वाढदिवसाला एका मोठ्या मेजवानीची तयारी केली होती. मळ्यावर ऑलिव्हच्या सावलीत सगळे नातेवाईक आणि मित्रमंडळी जमली होती आणि टेबलावर खाद्य पदार्थांची चंगळ होती. एका स्वतंत्र टेबलावर वाढदिवसाची केक ठेवली होती. वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी बाबा उभे राहिले.

“बाळ, शांत बस आणि बाबा काय म्हणताहेत ते ऐक,” आईने बाळाला सांगितले. मग बाबांनी बोलायला सुरुवात केली. भाषण बराच वेळ चालले होते. “आणि आता माझ्या लहानग्या बाळाला वाढदिवसाच्या मनापासून शुभेच्छा!” पण अँथनी बाळ कुठेच दिसत नव्हते.



तेवढ्यात काहीतरी पडल्याचा मोठा आवाज आला. सगळे इकडे तिकडे पाहू लागले तर छोट्या अँथनीवर केक पडली होती!

“हुं... ,” ग्रासिएला आजी म्हणाली, “अँथनी बाळ जरा खोडकरच दिसते!”





बाळ अँथनी हळू हळू मोठा होऊ लागला.

“तो चांगला उंच होणार आहे, तो माझ्या घरातल्यांच्या वळणावर गेलेला दिसतो,” एमिलियो आजोबा म्हणाले.



आता अँथनी कपातून दूध पिण्याएवढा मोठा झाला होता. ग्रासिएला आजी त्याला कपाने दूध प्यायला शिकवणार होती.

“कप दोन्ही हातात धर.” अँथनीने कप दोन्ही हातात धरला.





“आता कप उचल.” अँथनीने तसेच केले.



“आता कप तोंडाला लाव आणि दूध पी.” तेवढ्यात एक पक्षी गाऊ लागला.



“हा मुळीच लक्ष देत नाही, मग दुसरं काय होणार!” ग्रासिएला आजी म्हणाली आणि ते बरोबरच होते.





दर वर्षी अँथनी मोठा होत होता.
लवकरच तो शेतावर मदत करण्याएवढा मोठा झाला.

“अँथनी, ही टोपली घे. बागेत जा आणि मी तुला दाखवलं होतं तशी सॅलडची पाने काढ आणि मला स्वयंपाकघरात आणून दे.” एक दिवस आईने सांगितले.

“हो आई,” अँथनी म्हणाला आणि बागेत गेला.









“अँथनी, अरे हे रे काय?” आई ओरडली.






आता अँथनी शाळेत जाण्याइतका मोठा झाला होता. अँथनीला शाळा खूपच आवडत होती पण गुरुजी सारखे म्हणायचे, “अँथनी, लक्ष कुठे आहे? जरा नीट लक्ष दे पाहू!”



अँथनी वर्गातला सर्वात उंच मुलगा होता, म्हणून एक दिवस गुरुजींनी त्याला शाळा सुटल्यावर वर्ग आवरायला मदत करायला सांगितले.

“अँथनी, ही सगळी पुस्तकं जरा फळीवर लावून ठेवशील का? बाकीच्या गोष्टी मी परत आलो की आपण आवरू या. मी काय सांगितले ते नीट समजले ना?”

“हो गुरुजी. फळीवर ठेवायचे.” आणि अँथनी कामाला लागला.







अँथनी जसा उंच आणि मोठा झाला, तशी मळ्यावर त्याची गरज भासू लागली.



एक दिवस ग्रासिएला आजी म्हणाली, “अँथनी, शेतावर सगळे वाळलेलं गवत बांधून ठेवायचं काम करताहेत, त्यांच्यासाठी हे जेवण घेऊन जा. आणि हे बघ, त्यांच्यासाठी सावलीची जागा शोध, म्हणजे त्यांना उन्हात बसून जेवावं लागणार नाही.”

“हो आजी,” आणि अँथनी जेवण घेऊन निघाला.

अँथनीने आजूबाजूला पहिले. जवळपास एकही झाड नव्हते. “मला माहित आहे काय करायचं ते,” अँथनी मनात म्हणाला. “ मी हे जेवण आता गवताच्या गंजीखालीच ठेवेन म्हणजे ते छान गार राहील. आणि जेवणाची वेळ होईपर्यंत मी आता एक डुलकी घेतो.”

आणि अँथनी झोपला.



“अँथनी,” एमिलियो आजोबा म्हणाले, “उठ आता. जेवण कुठे आहे? आम्हाला सगळ्यांना खूप भूक लागली आहे.”

अँथनी खुशीत येऊन म्हणाला, “ग्रासिएला आजीने सांगितले तसेच मी केले. आजी म्हणाली, जेवण नीट सावलीत ठेव. म्हणून मी ते गवताच्या गंजीखालीच ठेवले आहे. आता जातो आणि घेऊन येतो.”





आता अँथनी त्याच्या घरात सर्वात उंच होता.

“तो आमच्या वळणावर गेला आहे,” एमिलियो आजोबा म्हणाले.

आता सगळे त्याला “उंच अँथनी” म्हणू लागले.





एक दिवस आई अँथनीला म्हणाली, “जा, बाबांना बोलावून आण, जेवण तयार आहे.”
“हो, आई,” अँथनी म्हणाला आणि पळतच बाहेर गेला.
“आणि अँथनी, कुठलंही फाटक उघडं टाकू नकोस, ऐकलंस का?”
“हो आई, फाटकं उघडतो!” अँथनी म्हणाला.
आणि त्याने तसेच केले.








त्याने सगळी फाटके उघडून टाकली.



“आता फार झालं!” बाबा म्हणाले. “अँथनीने आता बाहेर पडून स्वतः काम करून कमवायला हवे.”

“नाहीतर आपला सत्यानाश होईल,” ग्रासिएला आजी म्हणाली.




अँथनी आपले नशीब अजमावण्यासाठी बाहेर पडला, तसे घरातले सर्वजण त्याला निरोप देताना म्हणाले, “आमचे तुला आशीर्वाद आहेत. गुड लक अँथनी!”


आधी हमरस्त्यावरून आणि नंतर लहान रस्त्यांवरून अँथनी आनंदाने गाणे गुणगुणत दक्षिणेकडे चालला होता. सगळे जग आता त्याच्यासाठी मोकळे होते म्हणून तो खुशीत चालत होता.

सूर्यास्त होईपर्यंत अँथनी चालत राहिला. मग तो पिसा नावाच्या गावापर्यंत येऊन पोचला.


आता आणखी पुढे जाण्यासाठी फार अंधार झाला होता, म्हणून अँथनी एका भिंतीला टेकून बसला. आपल्या जवळची शिदोरी उघडून त्याने जेवण केले. आणि त्याला केव्हा झोप लागली हे त्याच्या लक्षातही आले नाही.



पहाटे पक्षांचा किलबिलाट ऐकून त्याला जाग आली. उभे राहून त्याने आळस दिला आणि डोळे उघडले. आणि समोरचे दृश्य पाहून त्याला धक्का बसला.




“मी भिंतीला फार जोरात टेकलो असणार,” त्याच्या मनात विचार आला. “पण मला ते दुरुस्त करता येईल.” आणि इतर कोणी उठून येण्यापूर्वी तो घाईने निघाला.



झुलता मनोरा दुरुस्त करून, अँथनी आनंदाने तिथून निघाला.

लवकरच तो फ्लोरेन्स नावाच्या गावाला पोचला. हे शहर कलाकृतींसाठी प्रसिद्ध होते.



मग अँथनीला एका चित्रकाराकडे काम मिळाले.


“हे बघ अँथनी, रंग तयार करणे हे तुझं पहिलं काम आहे. या रंगीत पावडरी आहेत ना? त्या प्रत्येकात पाणी मिसळून ते बरण्यांमध्ये भरून ठेव. समजलं का?”

“होय, साहेब,” अँथनी म्हणाला.





चित्रकार खोलीबाहेर गेल्यावर अँथनी कामाला लागला.
“हे रंग पाण्यात मिसळून बरण्यांमध्ये भरून ठेवायचे आहेत.”




आणि अँथनीने ते काम पूर्ण केले.




“माझ्या सगळ्या रंगांचं तू नुकसान केलं आहेस!” चित्रकार रागाने ओरडले. “चल निघ, इथून चालता हो!”

मग अँथनी चालू लागला ते रोम नावाच्या शहरात पोचेपर्यंत. इतक्या सुंदर इमारती आणि इतकी भव्य चर्च अँथनीने कधीच पाहिली नव्हती.



शहराच्या मध्यातून जाणाऱ्या नदीवर एक पूल होता आणि तो पार करून पलीकडे जाण्यासाठी शुल्क द्यावे लागत असे. लवकरच अँथनी त्या पुलापाशी आला.

"दोन नाणी द्या." टोल नाक्यावरचा माणूस म्हणाला.



"माझ्याकडे पैसे नाहीत. मी इथे काम शोधायला आलो आहे. तुम्ही जर मला पलीकडे जाऊ दिलेत, तर मी नक्की परत येऊन तुम्हाला पैसे देईन." अँथनी म्हणाला.


"आजचा दिवस तुझ्यासाठी चांगला दिसतो. मला एका मदतनिसाची गरज आहे. तुला ते काम करायचे आहे का?"

"हो साहेब!" आजूबाजूला पाहत अँथनी म्हणाला.


"तू सगळ्यांकडून दोन नाणी शुल्क घ्यायचे आहेस, पण कार्डिनल (चर्चचे मोठे अधिकारी) साहेबांकडून मात्र घ्यायचे नाही. नीट लक्ष देऊन ऐकतो आहेस ना?"

"हो साहेब. कार्डिनल साहेबांकडून," अँथनीने उत्तर दिले.

दिवसभर अँथनीने सर्वांना फुकटात पूल ओलांडून पलीकडे जाऊ दिले.



मग चर्चमध्ये काम करणारी मुले आणि धर्मगुरूंची मोठी मिरवणूक पुलावर आली आणि त्यात कार्डिनल साहेब सर्वांच्या मागे होते.



अँथनीने कोणाकडूनच पूल ओलांडण्याचे पैसे घेतले नाहीत. पण जेव्हा कार्डिनल साहेब पुलापाशी आले, तेव्हा अँथनी ओरडला, "थांबा. पूल ओलांडण्याआधी दोन नाणी द्या."

"पण मी तर कार्डिनल आहे."



"माफ करा, कार्डिनल साहेब, पण तुम्हाला पैसे द्यावे लागतील. इतर सगळ्यांना पूल फुकट ओलांडता येतो, पण तुम्हाला तसे करता येणार नाही. माझ्या साहेबानेच तसे सांगितले आहे."



मग अँथनी रोमहून निघाला आणि दक्षिणेकडे जात जात नेपल्स या शहरात येऊन पोचला.

त्याचे नशीब चांगले होते. शहरात आल्याबरोबर त्याला वेटरचे काम मिळाले.



"लोक काय मागतात त्याकडे नीट लक्ष दे. प्रत्येक गिऱ्हाईकाने जे मागवले असेल, तेच त्याला मिळाले पाहिजे," रेस्टॉरंटच्या मालकाने अँथनीला बजावले.

पण अँथनीचे लक्षच नव्हते.

“मी हे ईल मासे मागवले नव्हते. मला ते मुळीच आवडत नाहीत.”

“माझा पिझ्झा कुठे आहे?”

“वेटर, वेटर, तू मला सूप आणून दिलेस, मी तर पास्ता मागवला होता!”



“चल, चालता हो!” मालक ओरडला.

अँथनी रेस्टॉरंटमधून बाहेर पडला तेवढ्यात माउंट व्हेसुव्हियस या ज्वालामुखीचा स्फोट झाला.



“निदान ही तरी आता माझी चूक नाही आहे!” अँथनी म्हणाला.